क्र.महसूल/कक्ष.१/टे.१/एनएपी/सिझेडएमपी/कावि-३७/१८ दिनांक २२/०१/२०१८

## जाहीर सुचना

महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण पर्यावरण विभाग यांचेमार्फत सीआरझेड अधिसुचना २०११ अंतर्गत एकत्रित ठाणे व पालघर जिल्हयाचे प्रारूप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMPS) बनविण्याचे काम सेस (NCESS) केरळ यांचेमार्फत पुर्ण झाले असून सदर आराखडे प्रसिध्द करणे त्यावर सुचना व हरकती मागविणे आवश्यक असल्याने पालघर जिल्हयाचे प्रारूप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMP) दिनांक ३०/११/२०१७ रोजी पर्यावरण विभागाच्या http://mahenvis.nic.in/ व या कार्यालयाच्या http://palghar.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेले आहेत.

सदर प्रारुप आराखडयावर आराखडा प्रसिध्द झाल्यापासून प्राप्त हरकतीवर ४५ दिवसात जन सुनावणी घेण्याचे निर्देश होते. सदर प्रारुप आराखडयावर प्राप्त हरकतीच्या अनुषंगाने सोमवार, दिनांक २९/०१/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर या ठिकाणी जनसुनावणीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर जन सुनावणीस हरकतदार व इतर नागरीक यांनी आवश्यकते पुरावे व कागदपत्रासह उपस्थित राहणेबाबत डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी पालघर यांनी आवाहन केले आहे.

सही/-

**जिल्हाधिकारी पालघर करिता**

प्रत-: १) आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
३) सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार/डहाणू
४) उपविभागीय अधिकारी, वसई/वाडा/पालघर
५) गट विकास अधिकारी (सर्व)
६) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
७) मुख्याधिकारी, (नगरपरिषदा/नगर पंचायती) (सर्व)
८) ग्रामसेवक (ग्रामपंचायती सर्व)
९) मंडळ अधिकारी (सर्व)
१०) तलाठी (सर्व)
११) कार्यालयीन संचिका.

२/- सदरची जाहीर सुचना आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास आजच सादर करावा.

**जिल्हाधिकारी पालघर करिता**